## संपादकीय

# भुजबळांचे राजकीय चातुर्य

सूड घेतल्याचा आनंद एकच दिवस टिकतो. परंतु, क्षमा केल्याने आपल्या जीवनातील एक विरोधक कमी होतो आणि जीवनात जेवढे विरोधक कमी असतील तेवढी आपण जास्त प्रगती करू शकतो. त्यामुळे सूड घेण्याचा विचार करण्यापेक्षा क्षमा करण्याचा पर्याय नक्कीच उत्तम असतो.

हा संपूर्ण सुविचार सांगण्याचे प्रमुख कारण म्हणजे राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांची महाराष्ट्र सदन घोटाळ्याप्रकरणी सत्र न्यायालयाने केलेली निर्दोष मुक्तता. पाच वर्षांपूर्वी अटक झाल्यानंतर तब्बल २२ महिने कारागृहात काढूनही राजकारणात दमदार पुनरागमन केलेल्या भुजबळांची निर्दोष मुक्तता झाली. एखाद्या प्रकरणात आयुष्याचा शेवट होईल, असा अंदाज बांधला जात असताना त्याला खोटं ठरवत भुजबळांनी राजकीय पटलावरील आपले अस्तित्व कायम टिकवून ठेवले. विशेष म्हणजे निर्दोष मुक्तता झाल्यानंतर भुजबळ आता कुणावर सूड उगवतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. परंतु, विरोधकांसह त्यांच्या समर्थकांच्याही अपेक्षा फोल ठरवत भुजबळांनी आपण किती परिपक्व राजकारणी आहोत याचे दर्शन घडवून दिले. मझाले गेले, गंगेला मिळाले,फ असे सांगत कुणावर रोष नसल्याचा आनंद तर व्यक्त केलाच. परंतु, यापुढील राजकीय प्रवासात येणाऱ्या अडचणी कमी करण्याचा मार्ग त्यांनी पत्करला आहे.

दिल्लीतील महाराष्ट्र सदन आणि अन्य आर्थिक घोटाळ्यांप्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांना मार्च २०१६ मध्ये सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) सुमारे दहा तासांच्या कसून चौकशीनंतर रात्री दहाच्या सुमारास अटक केली. 'ईडी'ने भुजबळ यांना चौकशीचे समन्स बजावले होते व त्यांच्या कुटुंबीयांविरुद्ध मुंबई पोलिसांच्या फिर्यादीच्या आधारे काळा पैसा बाळगल्याप्रकरणी १७ जून, २०१५ रोजी मनी लाँडरिंगचे दोन गुन्हे दाखल केले. दिल्लीतील महाराष्ट्र सदनच्या बांधकामातील भ्रष्टाचार, कलिना येथील जमीन हडप करण्याचा गुन्हा नोंदवला होता. याशिवाय भुजबळ कुटुंबाच्या २८० कोटी रुपयांच्या मालमत्ताही जप्त केल्या. भुजबळ यांच्यासह त्यांचे पुत्र माजी आमदार पंकज भुजबळ, पुतण्या माजी खासदार समीर भुजबळ आणि अन्य संशयितांच्या नऊ ठिकाणांवर 'ईडी'ने दोनवेळा छापे टाकले होते. दररोज बाहेर पडणारे आकडे सर्वसामान्य माणसांचे डोळे विस्फारुन टाकत होते. नेमके हे आकडे कुठून येत होते याचा पत्ता अद्याप कुणालाही लागलेला नाही. परंतु, 'ईडी'ची कारवाई म्हटले की, अटक निश्चितच मानली जात होती. अशा काळात भुजबळांनी या प्रकरणाचा धैर्याने सामना केला.

सुमारे १०० कोटी रुपये खर्चून दिल्लीत बांधलेल्या महाराष्ट्र सदन घोटाळ्याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक खात्याने (एसीबी) आधीच भुजबळ यांच्यासह पंकज, समीर आणि अन्य १४ जणांवर आरोपपत्र दाखल केले होते. महाराष्ट्रसदन बांधण्याचे कंत्राट मेसर्स चमणकर डेव्हलपर्स यांना देण्यात आले होते. अंधेरीतील आरटीओ कार्यालय इमारत, मलबार येथील सरकारी अतिथीगृहाच्या बांधकामाचे कंत्राट देताना, नियम धाब्यावर बसविण्यात आले व त्यात भुजबळ कुटुंबाला मोठी लाच देण्यात आल्याचा 'ईडी'चा आरोप आहे. भुजबळ हे उपमुख्यमंत्री व सार्वजनिक बांधकाम मंत्री होते, तेव्हा हा आर्थिक घोटाळा झाल्याकडे 'ईडी'ने सर्वांचे लक्ष वेधले होते. भुजबळ कुटुंबाच्या आर्थिक गैरव्यवहारामुळे सरकारी तिजोरीचे ८७० कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचेही 'ईडी'चे म्हणणे आहे. भुजबळ कुटुंबाच्या आर्थिक व्यवहाराचा तपास करणाऱ्या 'ईडी'ला ज्या नोंदी मिळाल्या त्या नोंदी म्हणजे भुजबळ कुटुंबाला मिळालेली लाच आहे. कंत्राटदारांना प्रकल्पाचे काम देण्याच्या बदल्यात भुजबळ कुटुंबाला रोख रक्कम मिळाली असून, ती रक्कम विविध कंपन्या व व्यवसायात गुंतविण्यात आली असल्याचा 'ईडी'चा संशय आहे. यातूनच छगन भुजबळ व समीर भुजबळ यांना अटक झाली. छगन भुजबळ यांचे प्रभावक्षेत्र असलेल्या उत्तर महाराष्ट्रात या अटकेचे तातडीने हिंसक पडसाद उमटले. येवल्यात दुकाने बंद करण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी विंचूर चौफुली येथे रास्ता रोको करण्याचा प्रयत्न केला.

पोलिसांनी तातडीने त्यांना पांगवल्याने प्रकरण हाताबाहेर गेले नाही. घोटी येथे झालेल्या दगडफेकीत दोन बसगाड्यांचे नुकसान झाले. नाशिक तसेच मालेगावातही वातावरण काहीसे तणावपूर्ण झाले होते. परंतु, तेव्हाही भुजबळांनी संयमाची भूमिका घेतली. कोणत्याही प्रकारचे आंदोलन व निदर्शने करू नका, असा इशारा देत त्यांनी न्यायव्यवस्थेवर विश्वास ठेवण्याचे आवाहन केले होते. १४ मार्च २०१६ रोजी अटकेत गेलेल्या भुजबळांची ४ मे २०१८ रोजी जामिनावर सुटका झाली. सुटका होऊन बाहेर पडलेल्या भुजबळांना कमालीची सहानुभूती मिळाली. परंतु, त्यांच्यापर्यंत मर्यादित असलेल्या सहानुभूतीचे परिवर्तन हे मतपेटीत करण्यात त्यांना अपयश आले. लोकसभा निवडणुकीत त्यांचा पुतण्या समीर यांचा पराभव झाला. परंतु, एखाद्या पराभवाने खचणारे भुजबळ नाहीत. त्यांनी स्वत: येवला मतदारसंघातून विधानसभेची निवडणूक लढवली आणि विजय मिळवला. भुजबळांचा विजय निश्चित मानला जात असताना त्यांचे सुपुत्र पंकज भुजबळ यांचा अवघ्या साडेतेरा हजार मतांनी पराभव झाला. राज्यात सत्ता येण्याची कुठलीही शक्यता नसताना महाविकास आघाडीच्या रुपाने पक्षाला सत्ता तर मिळालीच शिवाय भुजबळांना पालकमंत्रीपदाचा बहुमानही मिळाला. सत्तेची ऊर्जा ही वेगळीच असते, असे म्हटले जाते. तसाच प्रकार भुजबळांच्या बाबतीत घडला. पाच वर्षात राजकीय विजनवासात गेलेल्या या नेत्याचे पुनरागमन झाले. हे पुनरागमनच अनेकांना आश्चर्यचकित करुन जाणारे ठरले. दोन वर्षांच्या सत्ता काळात भुजबळांची सत्र न्यायालयाने निर्दोष मुक्तता केल्याने नव्या इनिंगला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली, असेच म्हणावे लागेल. कारण भुजबळांसोबत त्यांच्या कुटुंबियांना व कार्यकर्त्यांना हा सर्वात मोठा दिलासा आहे.

भुजबळ हे मुळचे शिवसैनिक आणि मुंबईचे पहिले महापौर राहिले आहेत. त्यामुळे मुंबईपासून ते नाशिकपर्यंतच्या आजवरच्या राजकीय प्रवासात त्यांनी अनेक चढउतार अनुभवले. शिवसेना सोडल्यानंतर झालेला संघर्ष असेल किंवा शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या अटकेचा प्रसंग या सर्वांमध्ये त्यांचे कसब पणाला लागले. यातून सुखरुप बाहेर पडल्यानंतर राजकीय प्रवासात उपमुख्यमंत्री होण्यापर्यंत त्यांनी मजल मारली. राजकीय जीवनात प्रगतीचा आलेख उंचावत असताना त्यांना अनेकदा संघर्ष करावा लागला. या संघर्षातूनच भुजबळांची कारकीर्द बहरली आणि सत्तेच्या सारीपाटावर महत्वाचा नेता म्हणून त्यांचे नाव अधोरेखित झाले. मुंबईपासून सुरुवात झालेली राजकीय कारकीर्द आता नाशिकमध्ये येवून थांबली आहे. परंतु, नाशिक शहराने त्यांना फारशी साथ आजपर्यंत दिलेली नाही. महापालिकेत एकहाती सत्ता मिळवण्यात राष्ट्रवादीला अद्याप यश आलेले नाही. तर लोकसभा निवडणुकीत समीर भुजबळ यांचा अपवाद वगळता सातत्याने पराभवाचे धनी व्हावे लागले. या तुलनेत त्यांचा मतदारसंघ असलेल्या येवल्यात सलग विजय मिळवत भुजबळांनी आपली राजकीय घोडदौड कायम ठेवली.

सुपुत्र पंकज भुजबळ यांना दोन वेळा आमदार म्हणून निवडून आणल्यानंतर तिसऱ्यांदा त्यांचा पराभव झाला. मुंबईचे महापौर, राज्याचे उपमुख्यमंत्री, सार्वजनिक बांधकाममंत्री, गृहमंत्री अशी महत्वाची पदे सांभाळल्यानंतर राजकीय जीवनाचा शेवट होण्यासारखी स्थिती निर्माण झालेली असताना त्यातून पुन्हा उभारी घेऊन भुजबळांनी आपले कर्तृत्त्व सिद्ध केले. न्यायालयाने निर्दोष मुक्तता केल्यानंतर आता भुजबळ सूड उगवणार असा अंदाज बांधला जात होता. एखाद्या व्यक्तीला किंवा पक्षाला आव्हान देऊन पुन्हा संघर्ष करत बसण्यापेक्षा त्यांनी सूड ही भावना सोडून राजकीय पटलावर टिकून राहण्याचा निर्णय घेतलेला दिसतो. भाजपला आव्हान दिले तर थेट केंद्र सरकारकडून कारवाई होण्याची भीती नाकारता येत नाही. राहिला इतरांकडे बोट दाखवण्याचा मुद्दा तर ते सत्तेतले भागीदार असल्याने आता एक बोट उचलण्यापूर्वी तीन बोटे आपल्याकडे आहेत, याची काळजी अधिक घ्यावी लागते. त्यामुळे सुडाची भावना सोडून त्यांनी क्षमा व माफ करण्याचा मार्ग स्वीकारत राजकीय सूज्ञपणा दाखवून दिला.

जेव्हा या सर्व प्रकरणांविषयी प्रश्न उपस्थित करुन भुजबळांची परीक्षा बघितली गेली तेव्हा त्यांनी अत्यंत मिश्किल शब्दात उत्तर दिले, 'अपने खिलाफ बाते मै अक्सर खामोशी से सुनता हुँ, जवाब देने का हक मैने वक्त को दे रखा है!' यातून त्यांचा दृढनिर्धार दिसून येतो. राजकारणात प्रत्येक नेत्याकडून काहीना काही चुका होत आलेल्या आहेत. परंतु, त्यातून काहीतरी धडा घेऊन पुन्हा या चुका होणार नाहीत, यादृष्टीने पाऊल टाकणाऱ्या नेत्यांमध्ये भुजबळांची ओळख होते. अन्यथा एक चूक सुधारली तर दुसरी चूक त्यापेक्षा मोठी करुन ठेवणारे नेते राजकारणात अल्पावधीत मोठे होण्याच्या नादात 'आऊट' होतात. महाविकास आघाडीच्या नेत्यांमध्येही अशा नेत्यांचाही समावेश आहे. त्यांच्या कारकीर्दीला वेगवेगळ्या कारणांनी ग्रहण लागलेले दिसून येते. माजी गृहमंत्री अनिल देशमुख असतील किंवा सामाजिक न्यायमंत्री धनंजय मुंडे ही त्यांच्याच पक्षातील खास उदाहरणे आहेत. एक चूक लपवण्यासाठी सातत्याने केलेल्या छोट्या छोट्या चुका निस्तरताना त्यांच्या नाकी नऊ आलेले दिसतात. या दोघांच्या तुलनेत भुजबळ किती मुरब्बी आहेत, हेच या निकालातून आणि त्यानंतर दिलेल्या प्रतिक्रियेतून त्यांनी दाखवून दिले आहे. त्यामुळे भुजबळांचे राजकारण आता संपले असे अनेकदा वाटल्यानंतरही त्यांनी तेवढ्याच ताकदीने 'कमबॅक' करण्यामागे त्यांची प्रबळ इच्छाशक्ती व सकारात्मकता हेच प्रमुख कारण आहे, असे म्हणावे लागेल.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीजवळ चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# अजगराच्या न्याहरीतले किडूकमिडूक पक्ष

आमच्या लहानपणी 'बुद्धीके बाल' हा मिठाईचा एक महत्त्वाचा प्रकार होता. साखरेच्या पाकापासून म्हाताऱ्या बुढीच्या पांढऱ्या केसासारखी दिसणारी मिठाई असे तिचे स्वरूप होते. मिठाईवाला आपल्यासमोरच त्याचा छान पुंजका बनवायचा. आकर्षक असायचा. एखाद्या हॉलीबॉल सारखा किंवा त्याहीपेक्षा मोठा दिसायचा. पण प्रत्यक्षात त्याचा जीव मात्र किडूकमिडूक असायचा ! चुरगाळून एकत्र केला, तर तो मुठभर सुद्धा नसायचा. म्हणजे नुसतीच हवा. नुसताच आभास ! नुसतंच तोंडाला पाणी सोडणारा उपद्व्याप !

हे सारं आठवण्याचं कारण म्हणजे संभाजी ब्रिगेड आणि भाजपच्या युतीबाबत पुरुषोत्तम खेडेकर यांनी घेतलेली भूमिका ! शिवाजी-फुले-शाहू-आंबेडकर यांच्या नावावर उभ्या झालेल्या चळवळी आणि त्यातून निर्माण झालेले अनेक छोटेमोठे प्रादेशिक पक्ष शेवटी किडूकमिडूक सत्तेसाठी कसे कासावीस झालेले असतात, हे उदाहरण महाराष्ट्राला नवे नाही. अलीकडच्या काळात रामदास आठवले हे अशा पक्षांचे युगपुरुष मानायला हवेत.

एकंदरीत फुले-शाहू-आंबेडकरवाद हा राजकीयदृष्ट्या यशस्वी फॉर्म्युलाच नाही, असे मानायचे की त्या नावावर काम करणाऱ्या लोकांची तेवढी कुवत नाही, असे समजायचे? असे प्रश्न आता पडणे स्वाभाविक आहे. उलट शिवसेना या पक्षाने मांडलेली खरी/खोटी शिवशाही निदान महाराष्ट्रापुरता तरी यशस्वी फॉर्म्युला म्हणावा लागेल. काँग्रेसची स्वतःची स्वतंत्र आणि सर्वसमावेशक विचारधारा आहे. तिलाच गांधीवादी विचारधारा म्हटले जाते. राष्ट्रवादी काँग्रेसची नेमकी विचारधारा सांगणे कठीण आहे. ती एक बारामती पॅटर्न राजकीय भेळ आहे. तिच्यात केव्हा काय मिसळले जाईल, याचा काही निश्चित फॉर्म्युला नाही.

पुन्हा वर्णवादी व्यवस्था प्रस्थापित करण्याचा भारतीय जनता पार्टी आणि आरएसएस यांचा अजेंडा स्पष्ट आहे. आता त्यात कुठलाही संभ्रम राहिलेला नाही. त्यांची वाटचाल 'सेम तालिबानी' या दिशेने सुरू आहे. पूर्णतः तालिबानी होणे त्यांना झेपणारे नाही. कारण डायरेक्ट लढाई, ही त्यांच्या आवाक्यातली गोष्ट नाही. कारस्थानी मेंदू हे त्यांचे मुख्य शस्त्र आहे, शास्त्र आहे. त्याच्या बळावरच त्यांनी आजवर एवढा पल्ला गाठला आहे. कारस्थानात ७०/८० टक्के ते यशस्वी झालेले आहेत. २०२४ मध्ये त्यांना पुन्हा सत्ता हवी आहे. जर ती मिळाली, तर देशाचे काही खरे नाही !

महाराष्ट्राच्याच नव्हे तर देशाच्या पातळीवर विचार केल्यास शिवसेना हा भाजपचा सर्वात जुना साथी आहे. त्यांनाच गटकण्याचा प्रयत्न भाजपने सातत्याने केला आहे. भाजपा हा राजकीय अजगर आहे. प्रकरण हाताबाहेर जायला लागल्यामुळे उद्धव ठाकरे वेळीच सावध झाले आणि अजगराच्या तावडीतून निसटले. अर्थात महाविकास आघाडीचा पर्याय उपलब्ध होता, म्हणून ते यावेळी वाचले. अन्यथा त्यांचेही काही खरे नव्हते.



एवढी मोठी हक्काची शिकार निसटल्यामुळे अजगरावर महाराष्ट्रात उपासमारीची वेळ आली आहे. त्याची सहकुटुंब तडफड पाहिली की, यमुनेच्या डोहातला कालिया कसा आकांडतांडव करत असेल, याची कल्पना येते. पण महाराष्ट्राच्या डोहात त्याचा फणा सध्यातरी ठेचला गेला आहे, याबद्दल वाद नाही.

अजगर म्हणा की ॲनाकोंडा म्हणा, पण त्याची भूक प्रचंड आहे. नितीशकुमार सारखी मोठी शिकार त्याच्या अर्ध्या पोटातून अचानक निसटली होती. ती पुन्हा पकडण्यात त्याला यश आले. तोच प्रयत्न महाराष्ट्रात देखील सुरू आहे. बाळासाहेब गेल्यानंतर बकरी वाटणारं पिलू प्रत्यक्षात वाघाचं निघावं, असा अनपेक्षित अनुभव त्यांना आला आहे. तरीही पुन्हा ती शिकार पकडण्याचा प्रयत्न त्यांनी सोडलेला नाही. सद्यातरी त्यांच्या हाती काही लागेल, असे दिसत नाही. म्हणून मग किडूकमिडूक शिकारीकडे त्यांनी आपले लक्ष वळवले आहे.

अशा शिकारी त्यांनी आधीही केल्या आहेत. आठवले, राजू शेट्टी, महादेव जानकर, विनायक मेटे असे काही लोक त्यांच्या न्याहरीसाठी उपयोगाचे होते. पण राजू शेट्टी हुशार निघाले. अलगद निसटले. जानकर, मेटे यांचे पक्ष अजगराने अशा ठिकाणी नेवून संपवले, की आता त्यांनी कितीही बोंब मारली तरी महाराष्ट्र विश्वास ठेवणार नाही. आठवलेंचे राजकारण म्हणजे आंबेडकरी चळवळीच्या नावावर राजकीय अध:पतनाचा ऐतिहासिक मापदंड ठरेल. शिवाजी महाराज, शाहू महाराजांचे वारस देखील संघ दरबारी पोवाडे गाण्याच्या कामी लागलेलेच आहेत. त्यांच्या यादीमध्ये आता संभाजी ब्रिगेड या नावाची भर पडली आहे. संभाजी ब्रिगेडच्या निमित्ताने मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष पुरुषोत्तम खेडेकर यांनी जी राजकीय थिअरी मांडली ती धमाल मनोरंजक आहे. 'काहीही करून सत्ता मिळविणे हेच राजकीय पक्षांचे ध्येय असते, असावे..' हा जागतिक दर्जाचा सिद्धांत त्यांनी मांडला आहे. त्यामुळे फुले-शाहू-आंबेडकरवाद आणि त्यासोबत जगातील सारे मानवतावादी, समतावादी विचार, लढाया, संघर्ष एका झटक्यात त्यांनी भंगारात भिरकावले आहेत. मसत्ता हेच सत्य, सत्ता हाच परमेश्वर आणि सत्ता हाच शिवविचारफ अशी युगप्रवर्तक शिकवण त्यांनी उभ्या जगाला दिलेली आहे ! त्यामुळे आरएसएस सुद्धा त्यांना शरण येणार आहे !

काहीही करून सत्ता मिळवली पाहिजे, मराठा सेवा संघ आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांची भांडणे पूर्ववत कायम राहतील, ही राजकीय युती आहे - वैचारिक नाही.. वगैरे अशी भन्नाट भूमिका त्यांनी या निमित्ताने मांडली आहे.

मग प्रश्न असा पडतो, की तालिबानी लोकांनी ज्या तऱ्हेने सत्ता मिळवली, तो मार्ग देखील यांच्या कल्पनेतला मशिवमार्गफ समजायचा का? बरं, तुमचा वैचारिक विरोध जर प्रामाणिक असेल, बहुजन समाजाच्या हिताचा असेल, जिजाऊ-शिवाजी-संभाजी या महापुरुषांची प्रेरणा त्यामागे असेल, तर तुम्हाला संघाला शरण जाण्याची गरज का पडली ? देश किंवा निदान महाराष्ट्र तरी अशा कोणत्या संकटात सापडला आहे, की ज्याला वाचवण्यासाठी तुम्ही अशी भूमिका घेतली ? नितीश कुमार, शिवसेना सारख्या पक्षांना जे लोक कवडीची किंमत देत नाहीत, ते तुम्हाला किती आणि कशासाठी किंमत देतील ? तुमच्यामुळे काय महाराष्ट्र किंवा उत्तरप्रदेशात सरकार येण्याला मदत होणार आहे का ? गरज त्यांना आहे की तुम्हाला ? त्यांच्याप्रमाणे तुम्ही बदलणार की ते तुमच्याप्रमाणे ?

म्हणजे चार - दोन जागांच्या बदल्यात संभाजी ब्रिगेड आरएसएसची सत्ता देशावर प्रस्थापित व्हावी, यासाठी निष्ठेने प्रयत्न करणार आहे का? दोन स्टूल बसायला मिळाले, की बदल्यात सारा देश संघाच्या घशात घालायला मदत करणार का?

वरून पुन्हा मराठा सेवा संघ म्हणे आरएसएसच्या विरुद्ध म्हणे आपली वैचारिक लढाई पण सुरू ठेवणार आहे! आहे की नाही गंमत? बरं मग, खेडेकर साहेब नेमके कुणाच्या बाजूने असणार.. संभाजी ब्रिगेडच्या की मराठा सेवा संघाच्या ? की गडकरींच्या वाड्यावर ?

खरेतर सरळ भाजपशी सोयरिक करायची असेल तर तो त्यांचा अधिकार आहे. पण स्वतःच्या समर्थनासाठी त्यांनी जी शाब्दिक सर्कस केली, तो सरळ सरळ वैचारिक व्यभिचार आहे. सामाजिक विश्वासघात आहे. स्वार्थासाठी असंख्य भोळ्याभाबड्या तरुणांच्या भवितव्याशी केलेला पाशवी खेळ आहे !

अर्थात, उद्या भाजपा त्यांना किती भाव देणार, युती प्रत्यक्षात होणार की नाही, की गडकरींच्या इशाऱ्यावर टाकलेला हा वाईड बॉल आहे, की पुन्हा खेडेकर पलटी मारणार.. याबद्दल आज काहीही काहीही सांगता येणार नाही. बाकी काहीही असले तरी, खेडेकरांची ही भूमिका त्यांच्या भोळ्या भक्तांसाठी 'बुद्धीचे बाल' आहेत, विवेक जागा असलेल्या कार्यकर्त्यांसाठी मजोरका धक्काफ आहे, तटस्थ लोकांसाठी आश्चर्य आहे, आरएसएससाठी शाखेतील गंमत आहे, खेडेकरांसाठी कौटुंबिक पॅकेज आहे आणि भाजपच्या अजगरासाठी किडूकमिडूक नाश्त्याची सोय आहे !

आणि शेवटी नेहमी हवेत तरंगणाऱ्या, वास्तवाचे भान नसलेल्या विविध चळवळीतील लोकांसाठी फुले-शाहू-आंबेडकरी मांडणीच्या राजकीय उपयुक्ततेबाबत आत्मचिंतन करण्याची वेळ आहे !

तूर्तास एवढेच..!

**ज्ञानेश वाकुडकर**
**अध्यक्ष लोकजागर**
**९८२२२७८९८८**

## महामार्ग पोलीस केंद्र गडेगावच्यावतीने चालक दिवस कार्यक्रम साजरा

**लाखनी:**-देशातील दळणवळण व परिहवन क्षेत्रात महत्वाचा घटक असलेल्या वाहनचालकाची भूमिका पटवून देण्यासाठी अप्पर पोलीस महासंचालकाच्या आदेशानुसार राज्यातील सर्व राज्य व राष्ट्रीय महामार्गावर १७ सप्टेंबरला चालक वाहक दिवस कार्यक्रमाचे आयोजन करुन वाहनचालकांचे स्वागत करुन नियमांची माहिती करुन देण्यात आली.राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ वरील गडेगाव महामार्ग पोलीस केंद्राच्यावतीने वाहनचालक दिवसाचे कार्यक्रम



आयोजित करुन वाहनचालकांना माहिती देण्यात आली.अशोका टोलप्लाझा, सेंदुरवापा येथील टोलनाका, लाखनी बसस्थानकासमोर संघर्ष वाहन चालक संघटनेसोबत आणि महामार्ग पोलीस केंद्र गडेगाव येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी वाहनचालकाचे मनोबल वाढविण्यासाठी पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.तसेच वाहनचालविण्याचे नियमाची माहिती देण्यात आली.

यावेळी टोल मॅनेजर राय, संघर्ष वाहन चालक संघटनेचे दत्ता मेश्राम,वाहतुक शाखा नियंत्रण पोलीस निरिक्षक शिवाजी कदम,टोल मॅनेजर कुमार जायस्वाल,सामाजिक कार्यकर्ते पवन मस्के,इंडिया पँथरचे सामाजिक कार्यकर्ते बिरबल हलमारे आदीनी सहकार्य केले. या कार्यक्रमांतर्गत ११० ते १२० वाहनचालकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी महामार्ग पोलीस केंद्र गडेगावचे प्रभारी अधिकारी प्रमोद बघेले, पोलीस उपनिरिक्षक अमित पांडे, नितिन आगाशे आदी अधिकारी व वाहतुक पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

## बुधवारी राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे आंदोलन

**गोंदिया,:**घटनेत तरतूद असूनही बहुसंख्य ओबीसी समाज हा आपल्या हक्क व अधिकारापासून वंचीत आहे. त्यामुळे समाजाची स्थिती दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. संवैधानिक अधिकार प्राप्तीसाठी ओबीसीनी मतभेद बाजूला सारून एक जुटिने संघर्ष लढ्यात सहभागी व्हावे व २२ सप्टेंबर रोजी निवेदन सादर करण्यासाठी गोंदिया जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपस्थित राहावे, असे आवाहन राष्ट्रीय ओबीसी महासंघाने केले आहे. केंद्र सरकारने ओबीसींची जात निहाय जन गणना करावी, भारतीय संविधानाच्या कलम २४३ (ऊ)(६) आणि संविधानाच्या कलम २४३ (ख)(६) मध्ये सुधारणा (अमेंडमेंट) करून ओबीसींना २७ टक्के राजकीय आरक्षण राहील अशी तरतूद करावी. मा. सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेली आरक्षणाची ५० टक्के मर्यादा रद्द करण्याची घटनेमध्ये तरतूद किंवा सुधारणा करून संपूर्ण देशातील ओबीसींना न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी महासंघाच्या वतीने करण्यात आली आहेउपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष मनोज मेंढे,यांनी केले आहे.

# महात्मा गांधी,डॉ.बाबासाहेब आंबेडकर,गोळवळकर गुरुजी आणि भारताचे विसावे शतक

आपला भूतकाळ हा आपल्या वर्तमान काळाला प्रभावित करतो आणि आपला वर्तमान काळ हा आपला भविष्यकाळ निश्चित करतो

भारताचे विसावे शतक हे इतिहासाच्या दृष्टिकोनातून फार महत्वाचे आहे. भारताच्या विसाव्या शतकाला प्रभावित करणारे तीन नेते भारतात झालेले आहेत. त्यात १)महात्मा गांधी २) डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, ३) मा.स.गोळवलकर गुरुजी

महात्मा गांधीचा जन्म २ ऑक्टोबर १८६९ ला पोरबंदर येथे झाला या महात्म्याला ७९ वर्षाचे आयुष्य लाभले. वयाच्या १९ व्या वर्षी ते इंग्लंड ला गेले, व UCL मधून बॅरिस्टरी केली, त्यानंतर ते दक्षिण आफ्रिकेत गेले, तीथे त्यांनी वकीली केली दक्षिण आफ्रिकेतून ते १९१५ ला भारतात परत आले व १९ १७ ला त्यांचा पहिला सत्याग्रह चंपारण बिहार मध्ये केला. गांधीजींनी भारतातल्या त्यांच्या ३३ वर्षाच्या कार्यकाळात संपुर्ण भारतीय जनतेला प्रभावित केले. त्यांच्याबद्दल काही विसंगती असल्या तरी संपूर्ण भारतीय जनमनसाला प्रभावित करणारा आणि प्रचंड जनाधार असलेला हा एक मोठा नेता होता. एक काळ असा होता की महात्मा गांधीचा शब्द भारतातले लोक अंतिम समजायचे ,या माणसाने जनचळवळीत अनेक वेगवेगळे पायंडे पाडले. भारताला इंग्रजांपासून राजकीय स्वातंत्र्य मिळवून देण्यात या नेत्याचे मोठे योगदान आहे, हे नाकारताच येत नाही. या नेत्याच्या चळवळीचे प्रामाणिकपणे मूल्यांकन केले तर असे दिसते की, या नेत्यांची संपूर्ण चळवळ ही भारताला राजकीय स्वातंत्र्य मिळवून देण्याकरिता होती, पण जर का या नेत्याने आपली संपूर्ण शक्ती ही राजकीय स्वातंत्र्याची चळवळीत खर्च न करता हा नेता डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांसोबत आला असता तर कदाचित भारताचे आजचे चित्र फारच वेगळे असते. या नेत्याच्या अथक प्रयत्नाने भारताला १९४७ राजकीय स्वातंत्र्य मिळाले पण भारताची विषमतावादी समाजव्यवस्था व गरीबी तशीच कायम राहिली या विषमतावादी समाजव्यवस्थेवर या माणसाच्या चळवळीने काही विशेष प्रभाव टाकला नाही, समजा या नेत्याने राजकीय स्वातंत्र्याची चळवळ राबवली नसती तर काय झाले असते? तर भारताला १९४७ ला मिळालेले राजकीय स्वातंर्त्य ५० वर्षानंतर उशिरा मिळाले असते। एवढाच काय तो फरक भारताच्या इतिहासात झाला असता पण तोपर्यंत भारताच्या भूमीत कायद्याचे राज्य पक्के रुजले असते आणि ब्राह्मण समाजावर इंग्रजांचे आणि इतर वर्गाचे बरेच नियंत्रण आले असते. भारतात सामाजिक परीवर्तनाच्या चळवळीने फार जोर पकडला असता. या नेत्याच्या प्रयत्नाने भारताला राजकीय स्वातंत्र्य तर मिळाले पण इंग्रजाचे प्रयत्नाने एकसंघ झालेल्या भारताचे धर्माच्या नावावर दोन तुकडे मात्र झाले व भारताचे नेतृत्व आपोआप मवाळ ब्राह्मणाच्या हाती गेले. या मवाळ ब्राह्मणांनी आजपर्यंत एससी, एसटी, ओबीसी व मायनॉरिटी ला न्याय मिळू दिला नाही उलट इंग्रजांनी जे दिले तेही काढून घेतले. एकंदरीत काय तर काँग्रेसची चळवळ म्हणा वा गांधीजींची चळवळ म्हणा ही फक्त राजकीय सत्ता बदलासाठी होती व ती यशस्वी झाली पण या राजकीय सत्ता बदलाच्या चळवळीमुळे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीचे फार मोठे नुकसान झाले.

यानंतर विसाव्या शतकावर मोठा प्रभाव टाकणारे नेते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आहेत. गांधीजीच्या जन्मात आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मात २२ वर्षाचे अंतर आहे. बाबासाहेबांचा जन्म झाला त्यावर्षी गांधीजी इंग्लंडच्या UCL कॉलेजमधून बॅरिस्टरची पदवी घेऊन निघाले होते. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या वयाच्या २९ व्या वर्षी भारताच्या सर्व शोषित समाजासाठी माणगाव, कोल्हापूर येथुन १९२० साली



आंदोलन सुरू केले.

मोहनदास करमचंद गांधी हे त्यांच्या वयाच्या ४९ व्या वर्षी दक्षिण आफ्रिकेतून भारतात येतात व स्वातंर्त्याच्या आंदोलनात उतरतात तर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर वयाच्या २९ व्या वर्षी सर्वहारा समाजाच्या न्यायासाठी भारतात आंदोलन सुरू करतात. महात्मा गांधीच्या आंदोलनाचा सार काढला तर असे लक्षात येते की महात्मा गांधी चे संपूर्ण आंदोलन केवळ राजकीय बदलासाठी होते याला मानवी स्वातंत्र्याचे आंदोलन म्हणता येत नाही. या आंदोलनामुळे इथल्या शोषित समाजाच्या जिवनात काही विशेष फरक पडला नाही उलट या आंदोलनाने इंग्रजांच्या हाती असलेली देशाची राजकीय सत्ता बदलली व उच्चवर्णीयांच्याच हातात गेली व आजतागायत ती त्यांच्याच हातात केंद्रित आहे.

या उलट डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी सुरु केलेली सामाजिक चळवळ हीच या देशातील खरी चळवळ होती व आजही आहे असे दिसते बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीमध्ये संपूर्ण शोषित समाजाचे मानवतेचे आणि देशाचे हित स्पष्ट दिसून येते तर गांधीजीच्या चळवळीमध्ये सर्व उच्चवर्णीय ब्राह्मण, बनियाचे हित दिसून येते. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीमुळे इथल्या दलित शोषित बहुजन वर्गाला त्याच्या स्वाभिमानाची व स्व अस्तित्वाची जाणिव झाली व त्याला त्याच्या उत्थानाची स्पष्ट दिशा मिळाली, या चळवळीने बहुजन समाजाला सामाजिक, आर्थिक, राजकीय व धार्मिक दिशा मिळाली. एकप्रकारे शोषनावर आधारित हिंदुधर्माला समतेवर आधारीत बौध्दधर्माच्या रुपाने जबरदस्त व पक्का पर्याय मिळाला. जो २० व्या शतकातला इतर कोणताही नेता देवू शकला नाही म्हणून या नेत्यासोबत इतर कोणत्याही नेत्याची तुलनाच होत नाही.

यानंतर तिसरे एक नेते भारताच्या २० व्या शतकावर प्रभाव टाकतात ते नेते म्हणजे माधव सदाशिव गोळवलकर ज्यांना ब्राह्मणवर्ग अत्यंत आदराने "गुरुजी" म्हणतात. रा.स्व.संघाचे संस्थापक हेडगेवार हे काँग्रेसमध्ये सक्रिय होते पण त्यांची आदर्श राज्यसंकल्पना ही पेशवाई चे राज्य होते. कांग्रेस च्या चळवळीने भविष्यात भारतात राजकीय सत्ताबदल होयिलच असा निश्चित तर्क त्यावेळी बांधन्यात येत होता पण मिळालेल्या राजकिय आणि इतर सत्तेवर केवळ कट्टर वर्णवादी ब्राह्मणांचाच अधिकार नसेल हे सुध्दा स्पष्ट दिसत होते. म्हणून भारतीय जनमानसावर व संपुर्ण समाजावर वर्णव्यवस्थेचा प्रभाव परत कायम करण्यासाठी हेडगेवारांनी १९२५ साली राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली. हेडगेवार काँग्रेसमध्ये सक्रिय होते त्यांचे कांग्रेस सोबत कोणतेही मतभेद नव्हते तरीपण त्यांनी ब्राह्मणाचे वेगळे संघटन काढले. काँग्रेसमध्ये उच्चवर्णीय समाजाचे लोक नेते असले तरी त्यावेळी काँग्रेस ही मवाळ ब्राह्मणी विचाराच्या व आधुनिक विचारांच्या नेत्याच्या ताब्यात होती त्यात कट्टर ब्राह्मणी वर्णव्यवस्थावादी विचारांच्या नेत्यांचे पाहिजे तसे चालत नसे. भारतीय समाजावर कट्टर ब्राह्मणी विचारांचे वर्चस्व कायम ठेवायचे असेल, देशातले प्रत्येक क्षेत्र ब्राह्मणांच्या ताब्यात ठेवायचे असेल, तर ब्राह्मणी विचाराची स्वतंत्र चळवळ असने आवश्यक आहे असे वाटणारे कट्टर ब्राह्मणी नेते टिळक -सावरकर-हेडगेवार यांना स्वतंत्र ब्राह्मणी संघटनेची आवश्यकता वाटू लागली ज्या ब्राह्मणांना इंग्रजाचे राज्य, मुसलमानाचे राज्य,बौद्धांचे राज्य आदर्श वाटत नव्हते फक्त पेशवाईच आदर्श राज्य वाटत होती अशा नेत्याच्या संकल्पनेतून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा जन्म झाला . अशा नेत्यांच्या मनात ब्राह्मण जातीचे श्रेष्ठत्व आणि कट्टरता व अहं असल्यामुळे त्यांना वाटले की राजकीय सत्ता जरी आली तरी ती मवाळांची सत्ता असेल म्हणून या कट्टर ब्राह्मणांनी वेगळे होऊन १९२५ साली रा.स्वं.संघाची स्थापना केली. ज्या ब्राह्मणांचा वर्णव्यवस्थेवर जातव्यवस्थेवर पक्का विश्वास आहे अशा ब्राह्मणांनी ज्यांना पेशवाईचे राज्य आदर्श राज्य वाटत होते अशा पुण्याच्या टिळक-सावरकर -हेडगेवार मंडळीच्या विचारातून निर्माण झालेली ब्राह्मणाची स्वतंत्र चळवळ म्हणजे आर एस एस होय. ब्राह्मणांनी या चळवळीला आपल्या कौशल्याने चिकाटीने, धुर्ततेने आणि कुटीलतेने संपूर्ण भारतात पसरविले या संघटनेचा वैचारिक पाया तर्काच्या आधारावर पक्का करायचे काम मात्र गोळवलकरांनी केले.

गोळवलकरांचा जन्म १९०६ साली रामटेक नागपूर येथे झाला. त्यांनी नागपूर च्या हिस्लॉप कॉलेजमधून एम.ए. केले काही वर्षे बनारस हिंदू विद्यापीठामध्ये प्राध्यापकी केली आणि नंतर संघाच्या प्रचार आणि प्रसार कार्यात स्वतः ला वाहून घेतले. त्यांनी लिहिलेल्या बंच ऑफ थॉट्स आणि वुई आँर अवर नेशनहुड डिफाइन्ड मधून त्यांनी हिंदू राष्ट्र म्हणजेच ब्राह्मणराष्ट्र आहे व ते कसे साध्य करायचे आहे याचे दर्शन दिलेले आहे.त्यांनी लिहिलेल्या या ग्रंथातून त्यांना भारतात हिंदुराष्ट्राचे नावाखाली संपूर्ण वर्णव्यवस्था कायम करायची आहे हे स्पष्ट होते. भारताच्या लोकांचे सर्व क्षेत्रातील नेतृत्व फक्त ब्राह्मण वर्गाच्या किंवा ब्राह्मणी विचारांच्या प्रभावित असलेल्या नेत्याच्या हातातच असायला पाहिजे या विचारांचा अत्यंत समर्पकपणे पुरस्कार केला त्याकरता त्यांनी प्रचंड शिस्तबद्ध संघटनेची उभारणी केली .

राजकीय सत्ता बदलल्याने समाजात मन परिवर्तन होत नाही तर समाजाचे मनपरिवर्तन केल्याने समाजाच्या व देशाच्या सर्व क्षेत्रातील सत्ता मात्र काबिज करता येते व सर्वसामान्य जनतेला हिंदुराष्ट्राचे नावावर मानसिक गुलाम करता येते हे या नेत्याने सिद्ध करून दाखवले. समाजाचे विचार बदलून समाजाला सहज गुलाम करता येते यावर गोळवलकर यांचा विश्वास होता. बळजबरीने आता समाज गुलाम होणार नाही त्याच्या धर्माच्या नावावर राष्ट्राच्या नावावर देशाच्या नावावर विचार बदलूनच त्यांला गुलाम ठेवता येईल, ब्राह्मणाचा अंकित करता येईल व ब्राह्मणाचे हाती सर्व प्रकारची सत्ता सत्ता देता येईल यावर गोळवलकरांचा ठाम विश्वास होता. आणि या दुष्टीकोनातून त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला हिंदूराष्ट्राची वैचारिक बैठक दिली आणि परिवर्तन घडवून आणले .आज भारतात जे घडत आहे, तो सगळा गोळवलकर गुरुजींच्या विचारांचा परिपाक आहे , हे भारतीय बहुजन समाजाला कळायला फार वेळ लागेल. जेंव्हा कळेल तेंव्हा वेळ निघून गेलेली असेल. या सर्व २० व्या शतकात गाजलेल्या नेत्यांचे मूल्यांकन करायचे झाल्यास असे दिसते की महात्मा गांधीची चळवळ ही मवाळ ब्राह्मण व बनियाच्या फायद्याची ठरली. गोळवलकरांची चळवळ ही सर्व कट्टर ब्राह्मण -बनिया समाजाच्या वर्चस्वाची व हिताची आहे .पण डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ मात्र संपुर्ण देशाचे हित साधणारी व सर्व शोशित पिडीत मानवी समाजाच्या उत्थानाची चळवळ आहे.

**प्रमोद मून, नागपूर**

